**आरोग्य सेवा**

जाक्र/जि.रु.चं/NHM-RBSK/दरपत्रक/ 8443 /२६
कार्यालय जिल्हा शल्य चिकित्सक
जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर
दिनांक :- 29 MAY 2026

**प्रति,**

..............................
..............................
..............................

**विषयः-राष्ट्रीय आरोग्य अभियान.**
T-Permit वाहनाचे दरपत्रक सादर करण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये राष्ट्रीय आरोग्य अभियान राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमा अंतर्गत ३ आरोग्य तपासणी पथकाकरिता तीन T-Permit वाहनांची जिल्हा रुग्णालय, चंद्रपुर येथे आवश्यकता आहे.

तरी T-Permit वाहनांचे वाहनधारक/संस्थने कमीत कमी दर सिलबंद लिफाफामध्ये जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, चंद्रपुर यांचे नावे जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, जिल्हा रुग्णालय, चंद्रपुर येथे दि.०४/०६/२०२६ ला सायंकाळी ५ वाजेपर्यत दरपत्रक सादर करावे. त्याकरिता खालील अटी व शर्ती बंधनकारक असतील.

| अ.क्र. | विवरण | आवश्यक वाहन संख्या | वाहनाचे दरमाह सर्व समावेशक दर |
|---|---|---|---|
| १ | T-Permit वाहन | ०३ | |

**अटी व शर्ती**

१) T-Permit वाहनांचा जास्तीत जास्त वापर १५०० कि.मी. प्रतिमाह पर्यत करण्यात येईल.
२) वाहनाचे दर सर्व समावेशक असतील तसेच इंधन, वंगण, वाहन चालकाचे वेतन व भत्ते, वाहन दुरुस्ती, टोल टॅक्स व आरटीओ चालन इ. वाहन मालकाची जबाबदारी राहील.
३) वाहने ४+१ सीट असलेली बंद बॉडी या तत्सम स्वरुपातील व Engine Capacity 1000 CC च्या वर असने आवश्यक आहे.
४) पुरविण्यात येणारे वाहन मागील ८ वर्ष कालावधीपेक्षा जास्त जुनी नसावी.
५) वाहन T-Permit असने बंधनकारक असुन आरटीओ कडील सर्व परवाने व गाडीचा पुर्ण विमा भरलेला असणे आवश्यक आहे.
६) नविनतम वाहनांना प्राधन्य देण्यात येईल.
७) अटी व शर्तीमध्ये बदल करणे अथवा शिथिल करण्यासंबधीचे सर्व अधिकार जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, चंद्रपूर यांनी राखून ठेवलेले आहेत.
८) सदर वाहने ही शासनेचे पुढील आदेश होईपर्यत चालु ठेवण्यात येतील.
९) वाहनाचे दर निश्चित झाल्यावर वाहनाची तपासणी सेवा अभियंता यांचे कडुन तपासणी करुन घेणे अनिवार्य राहील.

**अर्जासोबत सादर करावयाचे कागदपत्रः-**

१) आर.सि.बुक
२) प्रवासी वाहतुकीचा परवाना.
३) प्रदुषण प्रमाणपत्र.
४) फिटनेस सर्टीफिकेट.
५) विमा नुतनीकरण.
६) टॅक्स पावती.
७) वाहन चालकाचा परवाना.

वरिल अटी व शर्तीनुसार वाहनधारक/संस्था वाहन लावण्यास इच्छुक असल्यास वरिलप्रमाणे दिलेल्या कालावधीत या कार्यालयास दरपत्रक वरिल नमुद कागदपत्रासह सादर करावे. वाहन लावण्याकरिता आवश्यक इतर अटी व शर्ती सोबत जोडलेल्या आहे.

**सहपत्र**:- वाहन लावण्यासंदर्भात सर्वसाधारण अटि व शर्ती

**जिल्हा शल्य चिकित्सक**
**जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर**

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## वाहन लावण्यासंदर्भात सर्वसाधारण अटि व शर्ती

१) वाहन भाडयाने घेतल्यापासुन वाहन निवासी वैद्यकिय अधिकारी (बा.सं) व राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाच्या पथकातील वैद्यकिय अधिकारी यांचे अधिनस्त कार्यरत राहतील.

२) वाहनाची दरमहा कमाल फिरस्ती १५०० कि.मी.पर्यंत राहील. १५०० कि.मी. च्यावरचे देयक अदा करण्यात येणार नाही. तसेच वाहन प्रत्यक्ष ज्या तारखेस मुख्यालयास हजर राहील त्या तारखेपासुन भाडे अदा करण्यात येईल.

३) इंधन, वंगण, दुरुस्ती, वाहन चालकाचे वेतन, दैनिक व प्रवास भत्ता, वाहन परमीट, विमा नुतनीकरण व इतर कागदपत्र अद्यावत करणे तसेच पिरीयॉडीकल मेंटनंस, सर्व्हीसींग इत्यादी खर्च वाहन मालकास/संस्थेस करावा लागेल. वाहन दुरुस्तीसाठी किंवा इंधनाकरिता होणारी धाव ही राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमात समाविष्ट होणार नाही. वाहन सदैव सुस्थितीत असावे, किलोमिटर चैन बंद नसावी. सर्व प्रकारच्या किरकोळ अथवा मोठया प्रकारच्या दुरुस्ती करणे ही वाहन मालकाची/संस्थेची जबाबदारी राहील. किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती एक दिवसात तर मोठया स्वरुपाची दुरुस्ती तिन दिवसात करुन देण्याची जबाबदारी वाहन मालकाची राहील तसेच त्या ऐवजी पर्यायी वाहनाची व्यवस्था वाहन मालकांनी करुन दयावी. तसेच इतर कोणतीही परिस्थीती उदभवल्यास जसे- आरटिओ विभागाने गाडी अडविल्या किंवा जप्त केल्यास पर्यायी वाहनाची व्यवस्था वाहन मालकांनी करुन दयावी. तसे न केल्यास वाहन भाडे कपात करण्यात येईल.

४) वाहनास कोणत्याही प्रकारचा अपघात झाला तर त्याची संपूर्ण जबाबदारी वाहन मालकाची/संस्थेची राहील. या करिता राष्ट्रीय आरोग्य अभियानाकडुन कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळणार नाही. अपघातानंतर दुरुस्ती निघाल्यास सदर वाहनाऐवजी पर्यायी वाहन तात्काळ उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही वाहन मालकाची/संस्थेची राहील. याकरीता अतिरीक्त दराने भाडे प्रदान केल्या जाणार नाही.

५) वाहन चालक हा वाहन मालकाचा/संस्थेचा नोकर असल्याने त्याचे वाहनास अपघात झाल्याने वा इतर बाबीमुळे नुकसार झाल्यास कोणताही नुकसान भरपाई या कार्यालयामार्फत मिळणार नाही. याची नोंद घ्यावी. संबंधित वाहन चालकानी कायदेशीर परवाना घेतला पाहिजे व त्याचे योग्य वेळी नुतनीकरण त्यांनी केले पाहिजे. वाहन चालकानी शाळा व अंगणवाडी तपासणी दरम्यान तपासणी साहित्य चढविण्यास व उतरविण्यास तसेच इतर कामास मदत करणे अनिवार्य राहिल.

६) मुख्यालयाचे बाहेरील प्रवासास पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. पुर्व परवानगी शिवाय फिरस्तीचे भाडे दर देय ठरणार नाही.

७) वाहन हे संदर्भसेवेसाठी जिल्हास्तरावर व जिल्हयाबाहेर बालकांना ने-आण करण्याकरीता वापरण्यात येईल. तसेच आरोग्य तपासणी कार्ड, औषधी करीता व गरज भासल्यास इतर राष्ट्रीय कार्यक्रमाकरीता, आढावा बैठकीसाठी व इतर तालुक्यात तपासणी करीता वाहनाचा वापर करण्यात येईल.

८) एखाद्या महिण्यात वाहन १५०० कि.मी. पेक्षा कमी चालल्यास उर्वरित किलोमीटरचा वापर गरज पडल्यास पुढील कोणत्याही महिण्यात करण्यात येईल. प्रत्येक महिन्याचे लॉगबुक हे संबंधित राबास्वाका पथकातील वैद्यकिय अधिकारी यांनी प्रमाणित केल्यानंतर प्रत्यक्ष लॉगबुकातील कि.मी. च्या आधारे निश्चित दराने देयके तयार करुन दरमहा या कार्यालयाकडे देणे आवश्यक राहील. त्यानंतरच निधी उपलब्धतेनुसार देयकाची अदायकी केली जाईल.

९) भाडेतत्वावर लावलेले वाहन कार्यक्रमाच्या वापरात असतांना कागदपत्रांच्या पुर्तते अभावी अथवा इतर कारणाने प्रादेशिक परिवहन अधिकारी अथवा वाहतुक पोलीस पथक यांनी पकडले असता होणा-या दंडात्मक कार्यवाहीसाठी वाहनधारक/संस्था स्वतः जबाबदार राहतील. वाहनाचे सर्व दस्ताऐवज आर.टी.ओ. नियमाप्रमाणे अद्यावत ठेवावे लागेल. दौऱ्याच्या वेळी ठिकठिकाणचा

दयावयाचा टोल टॅक्स इत्यादीचा अधिभार वाहन मालकाकडे राहील व त्या देयकाची प्रतिपुर्ती कार्यालयामार्फत देय राहणार नाही.

१०)वैद्यकिय अधिकारी व वाहनमालक/संस्था यांचे मतभेद झाल्यास याबाबत पुढील निर्णय जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर हे घेतील.

११)सदरहु व्यवहारासंबधी काही कारणात्सव अथवा वरील अटी व शर्तीचा भंग केल्यास विधिवत कार्यवाही करण्याची वेळ आल्यास अथवा सदरहु प्रकरण न्यायप्रविष्ठ झाल्यास त्याची मर्यादा चंद्रपूर न्यायालयापर्यंत मर्यादीत राहील.

१२)दरपत्रकात जे वाहन क्रमांक दर्शविण्यात येईल तेच वाहन आदेश मिळाल्यानंतर कार्यालयात कार्यरत राहील. काही कारणास्तव वाहन बदली करावयाचे असल्यास जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर यांच्याकडुन पुर्व परवानगी घ्यावी लागेल.

१३)वाहन मालकाला/संस्थेला जर वाहन बंद करावयाचे असल्यास जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या कार्यालयास आगावू किमान १५ दिवस अगोदर नोटीस दयावी लागेल.

**जिल्हा शल्य चिकित्सक**
**जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर**